# उपनिबंधक,सहकारी संस्था एल-विभाग,मुंबई

कक्ष क्र. ३११, ३,रा मजला, कोकण भवन, नवी मुंबई-४००६१४.

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ) अन्वये आदेश.**

३१५४
जा.क्र.मुंबई/एल-वि/बी-२/कलम-७७-अ/आदेश/ /२०१७
दिनांक :२९ /१२ /२०१७

वाचावे :-१) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ (ब-१) मधील तरतुदी.
२) श्री.जोसेफ अे मॅथ्यु यांची दि.२३.११.२०१७ रोजी प्राप्त झालेली तक्रार
३)श्रीमती हेमा झेवीयर, सेक्रेटरी, स्नेहल को ऑप हौ सो लि, कुर्ला (प) मुंबई ७० यांचे पत्र दि.१८.०९.२०१७ रोजीचे दि.२७.११.२०१७ रोजी प्राप्त झालेले पत्र.
४) या कार्यालयाची कारणे दाखवा नोटीस दि.०७.१२.२०१७.
५) श्री.जोसेफ मॅथ्यु यांचे दि.२१.१२.२०१७ रोजीचे लेखी म्हणणे

ज्याअर्थी, स्नेहल को ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि, २४६, एल बी एस मार्ग, अपो स्टेट बॅंक ऑफ इंडिया, कुर्ला (पश्चिम) मुंबई ४०० ०७०. ही संस्था या कार्यालयाचे कार्यकक्षेत नोंदणी क्रमांक बीओएम/डब्ल्यु एल/एचएसजी/८११/८४-८५ दि. ११/०७/१९८५ अन्वये नोंदलेली नोंदणीकृत सहकारी संस्था आहे. आणि.,

ज्याअर्थी, उपरोक्त वाचावे २ नुसार श्री.जोसेफ अे मॅथ्यु, व्यवस्थापक समिती सदस्य (अर्जदार) यांनी या कार्यालयाचे असे निदर्शनास आणुन दिलेले आहे की, संस्थेची सन २०१४ मध्ये निवड झालेली आहे. संस्थेचे अभिलेख व हिशोब हे संस्थेच्या सेक्रेटरी श्रीमती हेमा झेवीयर यांचे कडे असतात तसेच श्रीमती हेमा झेवीयर हया संस्थेत अधिवास करीत नसुन त्या बोरीवली येथे रहात आहेत. त्या संस्थेस क्वचितच भेट देत असतात. त्यांनी त्यांची सदनिका भाडे तत्वावर दिलेली आहे. श्रीमती झेवीयर हया संस्थेचे कामकाज करीत असतांना त्याचे अधिकाराचा गैरवापर करीत आहेत तसेच सभासदांचा पत्रव्यवहार स्विकारीत नाहीत. तसेच सन २०१४ पासुन स्टेटमेंट ऑफ अकौंट प्राप्त झालेले नाही. सन २०१६ चा वार्षिक लेखापरिक्षण अहवाल आणि स्ट्रक्चरल ऑडीट रिपोर्ट तयार करण्यांत आलेला असुन तो संस्थेच्या खजिनदार श्रीमती सिंथीया डिसुझा यांचे कडे असुन त्यावर सेक्रेटरी श्रीमती झेवीयर यांनी स्वाक्षरी केलेली नाही. तसेच सदरचे रिपोर्ट वार्षिक सर्वसधारणसभे पुढे सादर करण्यांत आलेले नाहीत. तसेच सेक्रेटरी यांनी निवडणुक कामी निबंधक कार्यालयास सादर करावयाची माहिती जसे ई-१, ई-२ बाबतची माहिती देखील सादर केलेली नाही. सेक्रेटरी यांचे कामकाजाचे तक्रारीचे अनुषंगाने वारंवार वरिष्ठ कार्यालयास तक्रारी करण्यांत आलेल्या आहेत. तसेच संस्थेचे सेक्रेटरी यांनी दि.३०.०९.२०१७ रोजी संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा देखील बोलविले बाबतची नोटीस, संस्थेत लावण्यांत आलेली होती. परंतु सदर दिवशी वार्षिक सर्वसाधारणसभा झालेली नाही. सदर प्रकरण अर्जदार यांनी या बाबत मा विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था मुंबई विभाग मुंबई यांना तक्रार केली असल्याचे कळल्यावर सेक्रेटरी व खजिनदार यांनी दि.३०.१०.२०१७ रोजी संस्थेत नोटीस लावलेली असुन त्यात दि.३०.१०.२०१७ रोजी संस्थेच्या सर्व समिती सदस्यांनी राजिनामे दिलेले असल्याचे नमुद केलेले आहे. व सदरचे नोटीस वर केवळ सेक्रेटरी व खजिनदार यांचीच सही आहे. तसेच सन २०१६-१७ या कालावधीचे लेखापरिक्षण देखील करण्यांत आलेले नाही. यास्तव उपरोक्त संस्थेवर प्राधिकृत अधिकारी/प्रशासकाची नियुक्ती करणे बाबत अर्जदार यांनी विनंती केलेली आहे. आणि

ज्याअर्थी, श्री.जोसेफ मॅथ्यु यांनी संस्थेची कार्यरत असणारी व्यवस्थापक समिती बेकायदेशिररित्या कार्यरत असले बाबत तक्रार केलेली होती त्या अनुषंगाने संस्थेचे चेअरमन/सेक्रेटरी यांना या कार्यालयाने दि.२३.१०.२०१७ रोजीच्या पत्रान्वये संस्थेची कार्यरत असणारी व्यवस्थापक समितीची निवड कधी झालेली व संस्थेचे चेअरमन/सेक्रेटरी हे संस्थेत न राहता त्यांनी त्यांची सदनिका भाडेतत्वावर दिलेली आहे या बाबत सविस्तर खुलासा

Scanned by CamScanner

करणे बाबत कळविलेले होते. त्या अनुषंगाने श्रीमती हेमा झेवीयर यांनी त्यांचे दि. २७.११.२०१७ रोजीच्या पत्राने संस्थेच्या संपुर्ण व्यवस्थापक समिती सदस्यांनी राजिनामे दिले असल्याचे या कार्यालयास कळविलेले आहे. आणि

ज्याअर्थी, श्री.योगेश पी डगली यांनी त्यांचे दि.१३.११.२०१७ रोजीच्या पत्राने या कार्यालयास ते त्यांचे चेअरमन पदाचा राजिनामा देत असल्याचे कळविलेले आहे. आणि,

ज्याअर्थी, श्रीमती सिंथिया जी डिसुझा यांनी त्यांचे दि.१७.१०.२०१७ रोजीच्या पत्रान्वये त्यांनी त्यांचे खजिनदार पदाचा राजिनामा देत असल्याचे कळविलेले आहे.

ज्याअर्थी संस्थेचे अध्यक्ष,सचिव व खजिनदार यांनी संस्थेच्या समिती सदस्यात्वाचा राजीनामा दिलेला आहे. म्हणजेच कोरम अभावी व्यवस्थापक समितीचे कामकाज ठप्प झालेले आहे. यास्तव संस्थेची निवडणूक प्रक्रिया सुरू करणेस्तव संस्थेवर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ (ब-१) मधील तरतुदीनुसार सदर संस्थेवर प्राधिकृत अधिकारी अथवा प्राधिकृत अधिकारी समिती यांची नियुक्ती करणे आवश्यक वाटते. आणि.,

ज्याअर्थी, उपरोक्त वाचावे क्र ४ अन्वये तक्रारदार यांनी दाखल केलेल्या तक्रारीनुसार कलम ७७ अ च्या तरतूदीस अधिन राहून सदर संस्थेच्या व्यवस्थापक समिती सदस्यांस व्यवस्थापक समितीवर सदस्य म्हणून निवडला जाण्यास किंवा राहण्यास अनर्ह का करण्यात येवू नये ? याबाबत व्यवस्थापक समितीचा लेखी खुलासा दिनांक २१/१२/२०१७ रोजी या कार्यालयात दाखल करणे बाबत व दिनांक २२/१२/२०१७ रोजी दुपारी ०३:०० वाजता सुनावणीस उपस्थित राहून आपली बाजू मांडणेसाठी अधिनियमाचे कलम ७७ (अ) अन्वये कारणे दाखवा नोटीस निर्गमित करण्यांत आलेली होती. आणि

ज्याअर्थी, उपरोक्त कारणे दाखवा नोटीसीच्या अनुषंगाने दि.२१.१२.२०१७ रोजी श्री.जोसेफ मॅथ्यु व श्री.जगदिश कारंडे यांचे वतीने श्री.बी बी साहु हे हजर होते व त्यांनी लेखी म्हणणे दाखल केलेले असुन त्यात त्यांनी नमुद केले आहे की, त्यांनी सदर प्रकरणी या कार्यालयात दि.२३.११.२०१७ रोजी कागपत्रे दाखल केलेली आहेत. तसेच दि.२२.१२.२०१७ रोजी उक्त संस्थेने कोणीही पदाधिकारी सुनावणी हजर राहिलेले नाहीत व श्री.जोसेफ मॅथ्यु व श्री.जगदिश कारंडे वगळता कोणीही लेखी म्हणणे देखील सादर केलेले नाही आणि

ज्याअर्थी, श्री.जोसेफ मॅथ्यु यांनी सादर केलेल्या लेखी म्हणण्यासोबत दि.०६.०७.२०१७ रोजीच्या विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त सादर केलेले आहे त्यावरुन चेअरमन श्री.जगदिश कारंडे, सेक्रेटरी श्रीमती हेम झेवीयर, खजिनदार श्रीम.सिंथीया डिसोझा आणि व्यवस्थापक समिती सदस्य श्री.जोसेफ मॅथ्यु यांची दि.०६.०७.२०१ रोजीच्या विशेष सर्वसाधारण सभेत झालेली असल्याचे दिसुन येत आहे त्या अनुषंगाने श्रीमती हेमा झेवीयर यां त्यांचे दि. २७.११.२०१७ रोजीच्या पत्राने संस्थेच्या संपुर्ण व्यवस्थापक समिती सदस्यांनी राजिनामे दिले असल्याचे कार्यालयास कळविलेले आहे. श्री.योगेश पी डगली यांनी त्यांचे दि.१३.११.२०१७ रोजीच्या पत्राने राजिनामा दिले आहे. श्रीमती सिंथिया जी डिसुझा यांनी त्यांचे दि.१७.१०.२०१७ रोजीच्या पत्रान्वये त्यांनी त्यांचे खजिनदार पदा राजिनामा दिलेला आहे.

त्याअर्थी संस्थेचे अध्यक्ष,सचिव व खजिनदार यांनी संस्थेच्या समिती सदस्यात्वाचा राजीन दिलेला आहे. म्हणजेच कोरम अभावी व्यवस्थापक समितीचे कामकाज ठप्प झालेले आहे. यास्तव संस्थे निवडणूक प्रक्रिया सुरू करणेस्तव संस्थेवर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ (ब

Scanned by CamScanner

मधील तरतुदीनुसार सदर संस्थेवर प्राधिकृत अधिकारी अथवा प्राधिकृत अधिकारी समिती यांची नियुक्ती करणे आवश्यक वाटत असल्याने खालील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यांत येत आहे.

## आदेश

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी, शिरीष सपकाळ, उपनिबंधक, सहकारी संस्था एल विभाग, मुंबई **स्नेहल को ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि, २४६, एल बी एस मार्ग, अपो स्टेट बॅक ऑफ इंडिया, कुर्ला (पश्चिम) मुंबई ४०० ०७०.** या संस्थेचे दैनंदिन कामकाज पाहण्यासाठी श्री.अे. जी. जाधव, यांची प्राधिकृत अधिकारी म्हणुन नियुक्ती करीत आहे.

सदरचा आदेश आज दि. /१२/२०१७रोजी माझे सही व या कार्यालयाचे मुद्रेसह दिला असे.

उपनिबंधक, सहकारी संस्था, एल विभाग, मुंबई

**(शिरीष सपकाळ)**
**उपनिबंधक**
**सहकारी संस्था, एल विभाग, मुंबई.**

प्रत
१.चेअरमन/सेक्रेटरी/खजिनदार/ व्यवस्थापक समिती सदस्य स्नेहल को ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि, २४६, एल बी एस मार्ग, अपो स्टेट बॅक ऑफ इंडिया, कुर्ला (पश्चिम) मुंबई ४०० ०७०.

२.**श्री.अे.जी. जाधव, (प्राधिकृत अधिकारी)** स्नेहल को ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि, २४६, एल बी एस मार्ग, अपो स्टेट बॅक ऑफ इंडिया, कुर्ला (पश्चिम) मुंबई ४०० ०७०.

यांनी त्वरीत संस्थेच्य दप्तराचा ताबा स्विकारुन तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा. तसेच सदर कालावधीत प्राधिकृत अधिका-याने दैनंदिन कामकाजाव्यतिरीक्त इतर सर्व कामकाजाबाबत निर्णय हे केवळ संस्थेच्या अधिमंडळाच्या सर्वसाधारण सभेमध्येच घ्यावेत.

**३. महाराष्ट्र राज्य सहकारी बॅक मर्यादित/ मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅक मर्यादित__________ शाखा.**

**____________________ शाखा.**

**४. इतर बॅक ____________________**

**उपनिबंधक**
**सहकारी संस्था, एल विभाग, मुंबई.**

Scanned by CamScanner